लोकमत

# विद्यापीठात सोमवारी उद्योगावर परिसंवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी (दि. १२) 'युनिव्हर्सिटी-इंडस्ट्री लिंकेजिस : एम्प्लॉएबिलिटी अँड आंत्रप्रिन्युअरशिप डेव्हलपमेंट' या विषयावर परिसंवाद होणार आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते सकाळी साडेदहा वाजता या परिसंवादाचे उद्घाटन होणार आहे.

राजर्षी शाहू सभागृहात परिसंवाद होणार असल्याची माहिती उद्योग संवाद केंद्र समन्वयक डॉ. एस. डी. डेळेकर व व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी दिली. अभय देशपांडे (इन्फ्रास्ट्रक्चर), जयराज पाटील (कास्टिंग), मोहन जयकर (विधिसेवा), सरनोबत (वस्त्रोद्योग), ओंकार गुणे (औषधनिर्माण), प्रीतम संघवी (प्लास्टिक), रवींद्र महाजन (ऑटोमोटिव्ह), संजय अरणके (प्रोडक्ट डिझाईन), सतीश डाकरे (अकाऊंटिंग), श्रेणिक घोडावत (एफएमसीजी), सचिन पाटील (माहिती तंत्रज्ञान), उदय निरगुडकर (पत्रकारिता) सहभागी होणार आहेत.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेचे आजपासून अधिवेशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेचे रौप्यमहोत्सवी वार्षिक अधिवेशन आज, शनिवार (दि. १०) व उद्या (दि. ११) जूनला इतिहास अधिविभागाने आयोजित केले आहे. याचे उद्घाटन विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते आज, शनिवारी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे.

या समारंभातच ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक प्राचार्य व्ही. डी. माने यांचा इतिहास परिषदेच्या वतीने सत्कार करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' या उपक्रमांतर्गत रोज एका ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या माहितीचे प्रसारण केले जाते. त्याच्या ३००व्या भागाचे प्रसारण करण्यात येईल. हा ३०० वा भाग सातारा जिल्ह्यातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक पांडुरंग गोविंद पाटील ऊर्फ पांडू मास्तर यांचा असणार आहे. इतिहास परिषदेचे माजी अध्यक्ष यांचाही सन्मान करण्यात येणार आहे. इतिहास परिषदेच्या अधिवेशनाचे बीजभाषण 'बदलते राजकारण आणि काही समकालीन संदर्भ' या विषयावर ज्येष्ठ विचारवंत व राजकीय विश्लेषक प्रा. डॉ. अशोक चौसाळकर हे करणार आहेत.

लोकमत

# विद्यापीठात कथ्थक नृत्य कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात सहा आणि सात जूनला कथ्थक नृत्य कार्यशाळा उत्साहात पार पडली. दोन दिवसीय कार्यशाळेमध्ये त्रिपुराच्या केंद्रीय विद्यापीठातील संगीत अधिविभाग प्रमुख व जयपूर घराण्याचे प्रसिद्ध कथ्थक नर्तक डॉ. अजयकुमार सवने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी यवतमाळ, इचलकरंजी, सांगली इत्यादी भागातील विद्यार्थीही उपस्थित होते. डॉ. सवने यांनी गणेशपरण, तत्कार, गतनिकास, उठाण, कवित्त इत्यादी कथ्थक नृत्यातील विविध प्रकार शिकविले. यावेळी प्रसिद्ध नृत्यगुरू मोहिनी दिवाण, संगीतसूर्य केशवराव भोसले यांचे नातू अशोक पाटील, गायक विश्वास सुतार उपस्थित होते. प्रा. डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी प्रास्ताविक केले. डॉ. निखिल भगत यांनी आभार मानले.

10 JUN 2023 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्ह

# नेहरूंच्या दूरदृष्टीने देश अन्नधान्यात स्वयंपूर्ण

## संजय कुबल : शिवाजी विद्यापीठातर्फे ऑनलाईन कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडित नेहरूंनी राबविलेल्या पंचवार्षिक योजनांमुळे देश अन्नधान्यात स्वयंपूर्ण झाला, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षणचे उपकुलसचिव डॉ. संजय कुबल यांनी केले.



दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या राज्यशास्त्र विषयांतर्गत 'महाराष्ट्राची संकल्पना आणि लघुसंशोधन प्रबंध सुलभ लेखनपद्धती' या विषयावर राज्यस्तरीय ऑनलाइन कार्यशाळेच्या 'महाराष्ट्राच्या संकल्पनेतील कृषी उद्योगाचे प्रारूप' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे होते.

उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे उपस्थित होते. डॉ. कुबल म्हणाले की, औद्योगिक क्रांतीपूर्वीचा भारत देश कृषिप्रधान होता, त्यावेळी संपूर्ण जग भारतावर अवलंबून होते. मात्र परकीय आक्रमणामुळे भारतीय शेतीवर दूरगामी परिणाम झाला. ब्रिटिश नफा आपल्या देशात घेऊन गेले व राज्यव्यवस्थेचा खर्च भारतीय अर्थव्यवस्थेवर टाकला. त्यामुळे शेतीचा ऱ्हास होण्याबरोबर शेतीप्रधान देश विरोधी दिशेला गेला. परिणामी, श्रीमंत शेतीचे प्रमाण कमी-कमी होत गेले. डॉ. सुशांत माने यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सचिन भोसले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बबन पाटोळे यांनी आभार मानले.

लोकमत

# १७२ विद्यार्थ्यांकडून 'लॉ'ची परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल-२०२३ उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू असून, शुक्रवारी बॅचलर ऑफ लॉ व बॅचलर ऑफ लॉ (स्पेशल) या दोन अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे पार पडल्या.

शुक्रवारीही इंटरनेट सेवेअभावी सीआरपीडी यंत्रणा सुरू नव्हती. त्यामुळे सीआरपीडी समन्वयकांच्या हातात प्रश्नपत्रिका देण्यात आल्या. परीक्षांसाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध परीक्षा केंद्रावर १७२ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेवेळी कोल्हापूर जिल्ह्यात सहा, सातारा जिल्ह्यात पाच अशा ११ गैरप्रकारांची नोंद झाल्याचे शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले. दरम्यान, 31 मे रोजी बीकॉम भाग तीन, सत्र सहातील ॲडव्हान्स्ड अकाउंटन्सी पेपर नंबर चार फुटला होता. विद्यापीठाने तो पेपर रद्द करून त्वरित दुसरा पेपर वितरित केला. यातील आठ महाविद्यालयांनी जुन्याच प्रश्नपत्रिकेद्वारे परीक्षा घेतली. यामुळे या आठ महाविद्यालयांची संबंधित विषयाची फेरपरीक्षा आज शनिवारी आहे.

लोकमत

# नेट परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे: विद्यापीठ अनुदान आयोगाच्या राष्ट्रीय पात्रता चाचणी नेट परीक्षेचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून (NTA) ८३ विषयांसाठी जून महिन्यांत दोन टप्प्यांमध्ये परीक्षा घेण्यात येणार आहेत. दि. १३ ते १७ जून आणि १९ ते २२ जून या कालावधीत दोन शिफ्टमध्ये या परीक्षा घेण्यात येणार आहेत.

देशातील विद्यापीठांसह महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापक तसेच ज्यूनिअर रिसर्च फेलोशिपसाठी नेट आणि राज्य पातळीवर सेट ही परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. विषय, परीक्षेची वेळ, शिफ्ट यांबाबत माहितीसाठी ugcnet.nta.nic.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

जनसंपर्क कक्ष
10 JUN 2023 लोकसत्ता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या १०० टक्के अंमलबजावणीसाठी आराखडा तयार करा

## चंद्रकांत पाटील यांचे विद्यापीठांना आदेश

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**मुंबई :** नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची महाराष्ट्रामध्ये अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, स्वायत्त महाविद्यालये आणि शैक्षणिक उपाययोजना केलेल्या संस्थांमध्ये सदर धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पुढील शैक्षणिक वर्षामध्ये सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमध्ये या धोरणाची शंभर टक्के अंमलबजावणी करण्यासाठी सर्व विद्यापीठांना ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत संभाव्य अडचणींचा आणि उपाययोजनांचा अभ्यास करून मसुदा तयार करणे बंधनकारक आहे. तर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून या धोरणाची संपूर्णतः अंमलबजावणी करण्यासाठी ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत अंतिम आराखडा व आनुषंगिक धोरण तयार करण्याच्या सूचना उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या आहेत.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा गाभा हा मातृभाषेतून शिक्षण मिळणे हा आहे. मातृभाषेतून शिकल्यामुळे विद्यार्थ्यांना संबंधित विषय व्यवस्थित कळेल. संशोधनवृत्ती विकसित होऊन विद्यार्थी नवनवीन शोध लावतील आणि एखाद्या उत्पादनाचे पेटंट घेऊन स्वाभाविकपणे वर्षानुवर्षे त्यांना उत्पन्न मिळत राहील. कला, विज्ञान, वाणिज्य, वैद्यकीय, अभियांत्रिकी यापलीकडे जाऊन शिक्षण दिल्यामुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्यांना वाव मिळेल. परिणामी, बेरोजगारी कमी होण्यास मदत होईल. भारतीय ज्ञान प्रणालीमधून विद्यार्थ्यांना आपल्या परंपरेची व महापुरुषांची माहिती मिळेल. सदर धोरणातून व्यवसायाभिमुख शिक्षण घेता येईल, असे मत चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची राज्यात अंमलबजावणी करण्यासंदर्भात सुकाणू समिती आणि सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंची मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात शुक्रवारी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठ-उद्योग संवाद वृद्धीसाठी १२ जूनला विशेष परिसंवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी (दि.१२) 'युनिव्हर्सिटी-इंडस्ट्री लिंकेजिस: एम्प्लॉएबिलिटी अँड आंत्रप्रिन्युअरशीप डेव्हलपमेंट' या विषयावर विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

राजर्षी शाहू सभागृहात होणाऱ्या परिसंवादाचे उद्घाटन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते सकाळी १०.३० वा. होणार आहे. या परिसंवादात अभय देशपांडे (इन्फ्रास्ट्रक्चर), जयराज पाटील (कास्टिंग), मोहन जयकर (विधी सेवा), एम. सरनोबत (वस्त्रोद्योग), ओंकार गुणे (औषधनिर्माण), प्रीतम संघवी (प्लास्टिक), रवींद्र महाजन (ऑटोमोटिव्ह), संजय अरणके (प्रोडक्ट डिझाईन), सतीश डाकरे (अकाऊंटिंग), श्रेणिक घोडावत (एफ. एम. सी. जी.), सचिन पाटील (माहिती तंत्रज्ञान) आणि उदय निरगुडकर (पत्रकारिता) सहभागी होणार आहेत, अशी माहिती विद्यापीठ व उद्योग संवाद केंद्राचे समन्वयक डॉ. एस. डी. डेळेकर, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागातर्फे आज अभियांत्रिकी प्रवेशाबाबत मार्गदर्शन सत्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग व इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने अभियांत्रिकी पदवी प्रवेश प्रक्रियेबाबत शनिवारी (दि. १०) सकाळी १० ते १ यावेळेत राजर्षी शाहू स्मारक भवनात मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये प्रवेश प्रक्रिया रजिस्टेशन, पसंतीक्रम, मेरिट लिस्ट, प्रवेश प्रक्रियेचे विविध टप्पे, प्रत्यक्ष प्रवेश व अत्यावश्यक कागदपत्रे या गोष्टींची माहिती तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सचे चेअरमन इंजि. आर. एन. पाटील मार्गदर्शन करतील. शिष्यवृत्ती, अभियांत्रिकीच्या विविध शाखा व त्यामधील संधी, सोयी-सुविधांची माहिती दिली जाणार आहे. विद्यार्थी, पालकांनी मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रवेश प्रक्रिया समन्वयक प्रा. महेश साळुंखे व इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सचे सचिव एस. बी. खोत यांनी केले आहे.

पुढारी

# ‘तंत्रज्ञान’मधील विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर :** अभियांत्रिकी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामध्ये विविध शाखांसाठी प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन केले जाते. या माध्यमातून स्थापत्य (सिव्हिल) विभागामधून १३ विद्यार्थ्यांची नियुक्ती बहुराष्ट्रीय कंपन्यांमधे झालेली आहे. यामध्ये शुभांगी सगट, महेश शेळके, तुषार रामेकर, मृणाल पाटील, विजय पुंड, समीर बकारकसाब, श्रेयश पाटील, वैभव कुमठेकर, ओंकार निकम, सर्वेश कुंभार, दानिश शेख, आयुष लोणारे, रोहन शिंबरे यांचा समावेश आहे. तंत्रज्ञान अधिविभागाला शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन शिंदे यांचे प्रोसाहन लाभले आहे. अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन सपली, विभागाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी गणेश पाटील, स्थापत्य विभागप्रमुख प्रा. महेश साळुंखे, वैभव कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागातील १३ विद्यार्थ्यांची नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झाली आहे.

तंत्रज्ञान अधिविभागामध्ये विविध शाखांसाठी प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले होते. याच्या माध्यमातून अधिविभागातील स्थापत्य विभागामधून विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

विद्यार्थ्यांना अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन सपली, विभागाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी गणेश पाटील, स्थापत्य विभाग प्रमुख प्रा. महेश साळुंखे, प्लेसमेंट प्रतिनिधी प्रा. वैभव कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेचे आजपासून रौप्य महोत्सवी अधिवेशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेचे रौप्य महोत्सवी वार्षिक अधिवेशन दि. १० व ११ जून रोजी इतिहास अधिविभागाच्या वतीने आयोजित केले आहे.

अधिवेशनाचे उद्‌घाटन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व माजी कुलगुरू प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते शनिवारी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे. इतिहास परिषदेच्या अधिवेशनाचे बीजभाषण 'बदलते राजकारण आणि काही समकालीन संदर्भ' या विषयांवर ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. अशोक चौसाळकर करणार आहेत.

ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक प्राचार्य व्ही. डी. माने यांचा इतिहास परिषदेतर्फे सत्कार केला जाणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' या उपक्रमांतर्गत रोज एका ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांच्या माहितीचे प्रसारण केले जाते. त्याच्या ३०० व्या भागाचे प्रसारण करण्यात येईल. इतिहास परिषदेचे माजी अध्यक्ष व इतिहास अधिविभागाचे माजी विभागप्रमुख यांचा सन्मान केला जाणार आहे. समारंभास उपस्थित राहण्याचे आवाहन आवाहन इतिहास अधिविभागाचे विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील, इतिहास परिषदेचे अध्यक्ष डॉ. भरतभूषण माळी यांनी केले आहे.

पुढारी

# पंडित नेहरू यांच्या दूरदृष्टीमुळे देश अन्नधान्यात स्वयंपूर्ण

## डॉ. कुबल; 'दूरशिक्षण'तर्फे राज्यस्तरीय कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारत देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांनी राबविलेल्या पंचवार्षिक योजनेमुळे देश अन्नधान्यात स्वयंपूर्ण झाला आहे. त्याला पंडित नेहरू यांची दूरदृष्टी कारणीभूत असल्याचे प्रतिपादन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव डॉ. संजय कुबल यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या राज्यशास्त्र विषयातंर्गत 'महाराष्ट्राची संकल्पना आणि लघु संशोधन प्रबंध सुलभ लेखन पद्धती' या विषयावर राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेत 'महाराष्ट्राच्या संकल्पनेतील कृषी उद्योगाचे प्रारूप' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे होते. यावेळी उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. कुबल म्हणाले, भारत हा देश



शिवाजी विद्यापीठातून

औद्योगिक क्रांती पूर्वीचा भारत कृषी प्रधान होता. त्यावेळी संपूर्ण जग भारत देशावर अवलंबून होते, मात्र परकीय आक्रमणामुळे भारतीय शेतीवर दूरगामी परिणाम झाला. यासाठी ब्रिटिशांचे धोरण कारणीभूत होते. ब्रिटिश नफा आपल्या देशात घेऊन गेले व राज्यव्यवस्थां खर्च भारतीय अर्थ व्यवस्थेवर टाकला त्यामुळे शेतीचा ऱ्हास होण्याबरोबर शेती प्रधान देश विरोधी दिशेला गेला आणि यातून श्रीमंत शेतीचे प्रमाण कमी कमी होत गेले. प्रास्ताविक डॉ. सुशांत माने यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सचिन भोसले यांनी केले. डॉ. बबन पाटोळे यांनी आभार मानले.

पुढारी

# विद्यापीठ पदवी परीक्षेला ९७२ विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षेला शुक्रवारी ९७२ विद्यार्थी उपस्थित होते.

९ जून रोजी बॅचलर ऑफ लॉ (पाच वर्ष), बॅचलर ऑफ लॉ (स्पेशल) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे झाल्या. भरारी पथकाकडून ११ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

10 JUN 2023
पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्

# उच्च शिक्षणात टप्प्याटप्प्याने नवे शैक्षणिक धोरण

## उच्च, तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांची माहिती

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

उच्च शिक्षण विभागातील अंतर्गत महाविद्यालय आणि विद्यापीठांत टप्प्याटप्प्याने नवे शैक्षणिक धोरण राबविले जाणार असून यावर्षी राज्यातील २०० स्वायत्त महाविद्यालये, १३ अकृषी विद्यापीठातील विभागांमध्ये व ज्या ठिकाणी पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रम शिकवला जातो अशा शैक्षणिक संस्था - महाविद्यालय आणि विद्यापीठांमध्ये नवे शैक्षणिक धोरण (एनईपी) राबवले जाणार असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले, १ जानेवारी २०२४ पासून राज्यातील सर्व विद्यापीठ आणि महाविद्यालयांना नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात सूचना केल्या जाणार आहेत.

### इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क

नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्कच्या धर्तीवर आता राज्यातील विद्यापीठांची व विविध महाविद्यालयांची राज्य पातळीवर संस्थात्मक क्रमवारी काढली जाणार आहे. यासाठी स्टेट इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क आणले जाणार आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 JUN 2023
पुण्यनगरी

# शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी अंतिम आराखडा तयार करा - पाटील

मुंबई : राज्यात नवीन शैक्षणिक धोरणाची (एनईपी) अंमलबजावणी सुरू केली आहे. त्याला गती देण्यासाठी सुकाणू समिती तयार करण्यात आली आहे. या समितीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पुढील शैक्षणिक वर्षांपासून सर्व विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमध्ये 'एनईपी' अंमलबजावणीसाठी अंतिम आराखडा तयार करावा, असे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.

राज्यात नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसंदर्भात सुकाणू समिती आणि सर्व कुलगुरूंची सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर आयोजित पत्रकार



परिषदेत पाटील म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तयार केले आहे. या धोरणानुसार बौद्धिक विकास व अध्ययनाच्या तत्त्वांवर आधारित अभ्यासक्रम व अध्ययन, शाखांची रचना, संधी, समानता, समावेशकता आणि शैक्षणिक दर्जा, नवीन संशोधन ही उद्दिष्टे ठेवून भारतीय शिक्षण पद्धतीत बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने हे धोरण तयार करण्यात आले आहे. यावर्षी सर्व अकृषी विद्यापीठ, स्वायत्त महाविद्यालये आणि ज्या संस्थांनी शैक्षणिक उपाययोजना केली आहे, अशा संस्थांमध्ये या धोरणाची अंमलबजावणी सुरू करण्यात येत आहे. पुढील शैक्षणिक वर्षात सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमध्ये १०० टक्के या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत सर्व विद्यापीठांनी संभाव्य अडचणींचा आणि उपाययोजनांचा अभ्यास करून ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अंमलबजावणी करण्यासाठी अंतिम आराखडा व अनुषंगिक धोरण तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

दरम्यान, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या सुकाणू समितीची बैठक मंत्री पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे झाली.

बैठकीला वरिष्ठ अधिकाऱ्यांसह अकृषी विद्यापीठांचे सर्व कुलगुरू उपस्थित होते.

## दोषींवर कठोर कारवाई केली जाईल

सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृहामध्ये घडलेली घटना वेदनादायी असून या घटनेच्या सखोल चौकशीसाठी समिती स्थापन करण्यात आली असून, दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे चंद्रकांत पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

## सर्वोत्कृष्ट विद्यापीठांचे रँकिंग जाहीर होणार

भारतातील उच्च शिक्षण संस्थांच्या मानांकनाचा सन २०२३ चा अहवाल केंद्र सरकारने जाहीर केला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील विद्यापीठ आणि संस्थांचा क्रमांक वरच्या यादीत असला पाहिजे, यासाठी अधिक प्रयत्न करावे लागणार आहेत. म्हणून केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्यातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठांचे रँकिंग जाहीर करण्यात येणार आहे. यासाठी राज्यातील सर्व विद्यापीठांनी यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन पाटील यांनी केले.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात सोमवारी 'उद्योग संवादवृद्धी' परिसंवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये सोमवारी (ता. १२) 'युनिव्हर्सिटी-इंडस्ट्री लिंकेजिस: एम्प्लॉएबिलिटी अँड आंत्रप्रिन्युअरशीप डेव्हलपमेंट' या विषयावर परिसंवाद होणार आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते सकाळी साडेदहा वाजता या परिसंवादाचे उद्‌घाटन होणार आहे. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होणाऱ्या या परिसंवादात विविध उद्योग-व्यवसायांमधील मान्यवर सहभागी होऊन चर्चा करणार आहेत, अशी माहिती विद्यापीठ व उद्योग संवाद केंद्राचे समन्वयक डॉ. एस.डी. डेळेकर आणि व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी दिली. या परिसंवादामध्ये अभय देशपांडे (इन्फ्रास्ट्रक्चर), जयराज पाटील (कास्टींग), मोहन जयकर (विधी सेवा), एम. सरनोबत (वस्त्रोद्योग), ओंकार गुणे (औषधनिर्माण), प्रितम संघवी (प्लास्टीक), रविंद्र महाजन (ऑटोमोटिव्ह), संजय अरणके (प्रोडक्ट डिझाईन), सतीश डाकरे (अकाऊंटिंग), श्रेणिक घोडावत (एफ.एम.सी.जी.), सचिन पाटील (माहिती तंत्रज्ञान), उदय निरगुडकर (पत्रकारिता) हे मांडणी करणार आहेत. उद्योगांना शैक्षणिक क्षेत्राकडून कोणत्या प्रकारच्या प्रशिक्षणाचे संपन्न मनुष्यबळ हवे आहे, त्या पद्धतीचा अभ्यासक्रम विकसित करणे आणि त्यायोगे विद्यार्थ्यांची रोजगाराभिमुखता वाढविणे हे प्रमुख हेतू ठेवून परिसंवाद आयोजित केला असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

सकाळ

# अभियांत्रिकी पदवी प्रवेश प्रक्रियेबाबत आज मार्गदर्शन

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग (डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी) आणि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स कोल्हापूरतर्फे अभियांत्रिकी पदवी प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शनपर सत्र उद्या, शनिवारी सकाळी १० ते दुपारी १ यावेळेत राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवनात होणार आहे.

विद्यार्थी व पालक यांच्या मनात प्रवेश प्रक्रियेबाबत अनेक प्रश्न व शंका असतात. त्यांचे निरसन करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. त्यात रजिस्ट्रेशन, पसंतीक्रम, मेरीट लिस्ट, प्रवेश प्रक्रियेचे विविध टप्पे, प्रत्यक्ष प्रवेश व अत्यावश्यक कागदपत्रे आदींबाबत माहिती तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सचे अध्यक्ष आर. एन. पाटील आणि इतर प्राध्यापक मार्गदर्शन करणार आहेत. प्रशासनाच्या विविध स्कॉलरशिप्स, शिवाजी विद्यापीठाच्या उपयोगी योजना, अभियांत्रिकीच्या विविध शाखा व त्यामधील असणाऱ्या संधी व सुविधा अशा विविध प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी विविध शाखांचे प्रमुख व तज्ज्ञ प्राध्यापक उपस्थित असणार आहेत. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. एस. एन. सपली, प्रवेश प्रक्रिया समन्वयक प्रा. महेश साळुंखे आणि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सचे सचिव एस. बी. खोत यांनी केले आहे.

सकाळ

# इतिहास परिषदेचे आजपासून शिवाजी विद्यापीठात अधिवेशन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेचे रौप्य महोत्सवी वार्षिक अधिवेशन उद्या, शनिवारी (ता. १०) आणि रविवारी (ता. ११) विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाने आयोजित केले आहे. या अधिवेशनाचे उद्‌घाटन माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते शनिवारी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे.

या कार्यक्रमात ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक प्राचार्य व्ही. डी. माने यांचा इतिहास परिषदेतर्फे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' या उपक्रमांतर्गत ३०० वा भाग सातारा जिल्ह्यातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक पांडुरंग गोविंद पाटील उर्फ पांडू मास्तर यांचा असणार आहे.

विद्यापीठ इतिहास परिषदेचे माजी अध्यक्ष, विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाचे माजी विभागप्रमुख यांचा सत्कार करण्यात येणार आहे. विशेष स्मरणिका आणि परिषदेचा शोधनिबंध संग्रह यांचेही प्रकाशन होईल. इतिहास परिषदेच्या अधिवेशनाचे बीजभाषण 'बदलते राजकारण आणि काही समकालीन संदर्भ' या विषयावर ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर करणार आहेत.

सकाळ

# उद्यानविद्या व रोपवाटिका व्यवस्थापन अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

कोल्हापूर : लोकविकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ संचालित उद्यानविद्या व
रोपवाटिका व्यवस्थापन हा एक वर्ष कालावधीचा अभ्यासक्रम गार्डन्स क्लबमध्ये
गेली पाच वर्ष सुरू आहे. प्रत्येक आठवड्यात बुधवार व गुरुवार दुपारी १ ते ३ या
वेळात अभ्यासक्रमाचे लेक्चर्स घेतले जातात. या अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया
सुरू झाली आहे. या अभ्यासक्रमामध्ये बाग कामातील सर्व पैलूंचा समावेश आहे.
विशेषतः बागेतील सर्व प्रकारची फुलझाडे, घरात लावण्यासाठीची सावलीतील
झाडे, कॅक्टस, सक्यूलंट्स आणि विविध फळझाडे यांच्या बरोबरच बागेतील सेंद्रिय
भाजीपाला या विषयाचा सखोल अभ्यास घेण्यात येतो. सर्व प्रकारची रोपे तयार
करण्यास शिकविले जाते. विविध प्रकारची सेंद्रिय खते आणि सेंद्रिय कीटकनाशके
घरच्या घरी कशी करता येतील याचे प्रशिक्षण दिले जाते. ऑनलाईन व ऑफलाईन
बॅचची प्रवेश प्रक्रिया सध्या सुरू असून प्रवेशाची अंतिम तारीख ३० जून आहे. प्रवेश
संख्या मर्यादित असल्याने इच्छुकांनी आपले प्रवेश त्वरित घ्यावेत, असे आवाहन
समन्वयक डॉ. प्रमिला बत्तासे व गार्डन्स क्लबच्या अध्यक्षा कल्पना सावंत यांनी
केले आहे. प्रवेशासंदर्भातील अधिक माहिती गार्डन्स क्लबच्या www. http://.
gardensclubkolhapur.org वेबसाईटवर भेट द्यावी.v

तरुण भारत

# डीओटी विभागातर्फे आज अभियांत्रिकी पदवी प्रवेशासंदर्भत मार्गदर्शन

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभाग (डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी) आणि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने अभियांत्रिकी पदवी परीक्षा प्रक्रिया संदर्भात आज शनिवारी (१० जून) सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत दसरा चौकातील राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवन येथे मार्गदर्शन पर चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

अभियांत्रिकी पदवी प्रवेश प्रक्रिया संदर्भात विद्यार्थी आणि पालकांच्या मनात अनेक शंका व प्रश्न असतात त्यांचे निरसन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ आणि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स कोल्हापूर यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. विद्यार्थी आणि पालकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्राध्यापक डॉक्टर एस. एन. सपली, प्रवेश प्रक्रिया समन्वयक प्राध्यापक महेश साळुंखे आणि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स सचिव एस. बी. खोत यांनी केले आहे.

तरूण भारत

# विद्यापीठात इतिहास परिषदेचे अधिवेशन आजपासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाने आयोजित इतिहास परिषदेचे रौप्य महोत्सवी वार्षिक अधिवेशनाला आजपासून सुरूवात होणार आहे. शनिवार दि.१० व ११ जून रोजी दोन आहे. यांचे उदघाटन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व वैज्ञानिक प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते होणार आहे. इतिहास परिषदेच्या अधिवेशनाचे बीजभाषण 'बदलते राजकारण आणि काही समकालीन संदर्भ' या विषयावर ज्येष्ठ विचारवंत व राजकीय विश्लेषक प्रा. डॉ. अशोक चौसाळकर मार्गदर्शन करणार आहेत. शनिवारी सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात अधिवेशनाला प्रारंभ होणार आहे.

तरूण भारत

# विद्यापीठाचे रायगडावर प्लास्टिकमुक्ती अभियान

- शिवाजी विद्यापीठातील एनएसएसचे अभियान
- विद्यार्थ्यांनी गोळा केला १३ हजार किलो कचरा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ आणि शहाजी छत्रपती महाविद्यालय यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील पावणेदोनशेहून अधिक स्वयंसेवकांनी शिवराज्याभिषेक दिनानिमित्त दुर्गराज रायगडावर स्वच्छता मोहीम, प्लास्टिकमुक्ती अभियान आणि वाहतूक नियंत्रणासाठी मदत केली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील इतर अधिकाऱ्यांनी रायगडावर उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विद्यापीठस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिर दोन जून ते आठ जून या कालावधीत सुरू आहे. शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्त विशेष संस्कार शिबिर राबवले. शिबिरांतर्गत शिवाजी विद्यापीठात आणि किल्ले रायगड येथे विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहीम आणि प्लास्टिक मुक्ती अभियान राबवले. स्वयंसेवकांनी सुमारे १३ हजार किलोहून अधिक कचरा व प्लास्टिकचे संकलन केले. पाण्याच्या रिकाम्या बाटल्या, प्लॅस्टिक कचरा यांची ९० हून अधिक पोती संकलित करून पुनर्चक्रीकरण केले जाणार आहे. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रेरणा घेऊन जीवनाची वाटचाल करावी. जल संवर्धन, वृक्ष संवर्धन आणि कचरा व्यवस्थापनाचे तत्त्व अंगीकारावे. यातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी पर्यावरण आणि प्लास्टिक मुक्ती अभियान या संदर्भात मार्गदर्शन केले. शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मानसिंग बोंद्रे, शहाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांचेही प्रोत्साहन मिळाले. डॉ. पी. बी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सयाजीराव गायकवाड यांनी आभार मानले.

यावेळी बीसीयुडी माजी संचालक डॉ. डी. आर. मोरे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, एन. एस. एस.चे संचालक डॉ. तानाजी चौगुले, नवयुग शिक्षण संकुल, महाडचे अध्यक्ष रंजीतसिंह भोसले, प्रशासकीय अधिकारी एस. एम. पालकर आदी उपस्थित होते.